मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मंत्री प्रदीपसिंग जडेजा यांनी घेतला पिंपरी, चिंचवड, भोसरी विधानसभांचा आढावा

## विकासकामे, पक्षाची बूथ रचना, मतदार नोंदणी याबाबत माहिती घेवून : तिनही विधानसभा निहाय पदाधिका-यांसोबत चर्चा करून मार्गदर्शन केले.



**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने गुजरातचे माजी गृहमंत्री तथा प्रवासी प्रभारी नेता प्रदीपसिंह जडेजा यांनी आज पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तिन्ही विधानसभांचा आढावा घेतला. तसेच, पक्षाने केलेली विकासकामे, पक्षाची बूथ रचना, मतदार नोंदणी याबाबत माहिती घेवून तिनही विधानसभा निहाय पदाधिका-यांसोबत चर्चा करून मार्गदर्शन केले. यावेळी, शहराच्यावतीने शंकर जगताप यांनी श्री. जडेजा यांचे स्वागत केले.

यावेळी, भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप, आमदार महेशदादा लांडगे, प्रदेश उपाध्यक्ष अमर साबळे, आमदार उमाताई खापरे, समन्वयक राम गावडे, प्रदेश सदस्य सदाशिव खाडे, दक्षिण भारतीय आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, संतोष कलाटे, महेश कुलकर्णी, सरचिटणीस नामदेव ढाके, विलास मडेगिरी, पिंपरी विधानसभा संयोजक संजय मंगोडेकर, अजय पाताडे, शैला मोळक, चिंचवड विधानसभा संयोजक काळूराम बारणे, भोसरी विधानसभा संयोजक विकास डोळस, मंडल अध्यक्ष सोमनाथ भोंडवे, संदीप नखाते, प्रसाद कस्पटे यांच्यासह कोअर कमिटी सदस्य, माजी नगरसेवक – नगरसेविका, विविध मोर्चा अध्यक्ष, पदाधिकारी आदी उपस्थित होते.

श्री. प्रदीपसिंग जडेजा यांच्यावर महाराष्ट्रातील मावळ, पिंपरी, चिंचवड, भोसरी, आंबेगाव, जुन्नर, शिरुर, खेड या ८ विधानसभा मतदार संघाची प्रवासी प्रभारी नेता म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी यांच्या बैठका मोरवाडी येथील भाजपा पक्ष कार्यालय, हॉटेल कलासागर येथे घेण्यात आल्या.

भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघाची माहिती दिली. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीत पिंपरी, चिंचवड, भोसरी मतदारसंघात भाजपनेच मोठा लीड राखला. यात पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी झोकून देवून काम केले. आजही तिनही मतदारसंघात भाजपाची पकड मजबूत असून, आगामी निवडणूकीत मोठया मताधिक्याने भाजपसह महायुतीचे उमेदवार निवडून येतील, असा विश्वास शंकर जगताप यांनी व्यक्त केला.

श्री. जडेजा यांनी पदाधिकारी व कार्यकर्ते यांचेसोबत चर्चा करून आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षाची बुथ रचना, मतदार नोंदणी संदर्भात आढावा घेतला. पक्षाची ध्येय धोरणे, महायुती सरकारने अर्थसंकल्पात जनतेशी संबंधित घेतलेले निर्णय व योजना जनतेपर्यंत पोहोचविण्यासंदर्भात महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी चर्चा करून बुथ रचना मजबूत करण्यासोबतच जास्तीत जास्त मतदार नोंदणी आणि दुरुस्ती करण्याची सूचना देखील त्यांनी केली. त्याचप्रमाणे राज्यातील महायुती सरकारने महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, वर्षात तीन सिलेंडर मोफत योजना, मुलींना उच्च शिक्षण मोफत देण्याची योजना जाहीर केली आहे. या योजनासह केंद्र आणि राज्याच्या सर्व योजना प्रत्येक लाभार्थीपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले. तसेच, विरोधकांच्या फेक नरेटीव्हला जशास तसे उत्तर द्या, असेही त्यांनी सांगितले..


# मोशीतील सोसायटीसमोरील त्या 'मार्जिनल' जागेतील दुकानदारीला बसणार चाप

## मार्जिनल जागेत वाढीव बांधकाम ; सुरक्षिततेबाबत ते शॉपधारक अनभिज्ञ

**पिंपरी | प्रतिनिधी**

शिवरोड वरील कुमार प्रिन्सविले गृहनिर्माण हौसिंग सोसायटीसमोर काही शॉपधारकांकडून वाढीव बांधकाम केले आहे. तसेच त्या परिसरातून गॅस लाईन गेली असून, कुठल्याही प्रकारची फायर सेफ्टी इतर नियम पाळले जात नसल्याचे चित्र पहायला मिळत आहे. त्यामुळे सोसायटीची आणि परिसराची सुरक्षितता धोक्यात असल्याचे बोलले जात आहे.

सोसायटी समोरील शॉपधारकांनी अनधिकृत अथवा सुरक्षेच्या बाबतीत नियमाचे उल्लंघन केल्यास प्रथम सोसायटीच्या माध्यमातून नोटीस जाणे अपेक्षित आहे. या शॉपधारकांबाबत सोसायटीतील सदस्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका आणि भोसरी एमआयडीसीमध्ये तक्रार केली असल्याची माहिती दिली. मात्र कुठल्याही प्रकारची कारवाई झाली नाही असे सदस्यांचे म्हणने आहे. मात्र सोसायटीतही रेफ्यूज एरीया, डक्ट च्या ठिकाणी फर्निचर करून पॅक केले असून, अनुचित प्रकार घडल्यास याला जबाबदार कोण असा सवाल काही सदस्यांकडून व्यक्त केला जात आहे.



“ प्रथमतःसोसायटीतील कमिटीने या शॉपधारकांना पाठीशी न घालता नोटीस बजावणे आवश्यक आहे. नोटीस दिल्यानंतरही कुठल्याही प्रकारची सुरक्षितता किंवा वाढीव बांधकाम काढून घेतले नाही तर त्यांच्यावर महापालिकेच्या माध्यमातून कारवाई केली जाईल.
- मनोज लोणकर, उपायुक्त, पिंपरी महापालिका.

“ कोविडच्या आधी त्या सदस्यांना सोसायटी हॅन्डओव्हर केलेली आहे. सोसायटी हॅन्डओव्हर झाल्यानंतर त्या शॉपधारकांनी वाढीव बांधकाम केले असेल. त्यामुळे माझे या चुकीच्या गोष्टीला प्रोत्साहन नाही. सोसायटीतील नागरिकांनी याबाबत निर्णय घ्यावा. सोसायटी हॅन्डओव्हर झाल्याने बांधकाम व्यावसायिकाचा रोल संपलेला आहे.
- अमेय जैन, बांधकाम व्यावसायिकन.

“ मोशीतील त्या शॉपधारकांबाबत महापालिकेने सर्व्हे करणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी वाढीव बांधकाम सुरक्षितता न पाळल्यास त्यांच्यावर अतिक्रमण कारवाई करावी. शहरात अनेक ठिकाणी शॉपधारकांनी ताबा मिळाल्यानंतर वाढीव बांधकामे केली आहेत. मात्र मोशीतील त्या शॉपधारकांनी कुठल्याही नियमांचे पालन केले नसेल तर त्यांच्यावर कारवाई आवश्यक आहे.
- संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली-मोश-चऱ्होली हौसिंग फेडरेशन.

# आज हरतालिकेचे व्रत; बाजारपेठांत महिलांची गर्दी

## गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवश महिला व कुमारिका हरतालिकेचे व्रत करतात.



**पिंपरी | प्रतिनिधी**

गणेश चतुर्थीच्या आदल्या दिवश महिला व कुमारिका हरतालिकेचे व्रत करतात. यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या खरेदीसाठी शहरातील बाजारपेठांत महिलांची गर्दी दिसून आली. बाजारात हरतालिकेच्या मूर्त विक्रीस उपलब्ध आहेत.

भाद्रपद महिन्याच्या शुद्ध पक्षातील तृतीयेला हरितालिकेचे व्रत केले जाते. विवाहित महिला आपल्या पतीच्य दीर्घायुष्यासाठी हे व्रत करतात. तर अविवाहित मुली इच्छित वर मिळवण्यासाठी हे व्रत करतात. या दिवशी शंकर आणि पार्वतीची पूजा करण्याची परंपरा आहे. या दिवर्श मातीचे गौरी शंकर किंवा शिवलिंग बनवले जातात. पूजेपूर्वी विवाहीत स्त्रिया सौभाग्याचे अलंकार घालून सुंदर तयारी करतात. तसेच, वाळू किंवा मातीपासून हे शिवलिंग किंवा शिव, पार्वती आणि गणेशाच्या मूर्ती बनवतात.

मात्र, सध्या धावपळीच्या युगात नोकरदार महिलांना या सर्व गोष्ट करणे जमत नाही. तसेच शहरी भागात माती मिळणेदेखील कठीण असते. त्यामुळे रेडिमेड हरतालिका आणि सोबत शिवलिंग असलेल्या मूर्तींना मागणी असते.

# उदंड झाले फ्लेक्स, सर्वच राजकीय पक्षांकडून उल्लंघन

## शहरातील माजी नगरसेवकांपासून ते गल्लीतील कार्यकर्त्यांपर्यंत फ्लेक्सबाजी करण्याची जणू स्पर्धाच लागली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील माजी नगरसेवकांपासून ते गल्लीतील कार्यकर्त्यांपर्यंत फ्लेक्सबाजी करण्याची जणू स्पर्धाच लागली आहे. शहर विद्रुपीकरण प्रतिबंधक कायदा कागदावरच असून सर्वच राजकीय पक्षांकडून याचे उल्लंघन होत असल्याचे दिसून येत आहे.

पुणे महापालिकेच्या हद्दीत अनधिकृत फ्लेक्सबाजी जोरात आहे. शहर विद्रुपीकरण प्रतिबंधक कायद्यांतर्गत फ्लेक्सबाजी करता येत नाही. उच्च न्यायालयाने संबंधितांवर कायदेशीर कारवाई करा, दंडाची शिक्षा द्या, असे आदेश सर्व महापालिकांना दिले आहेत. मात्र, सर्वच राजकीय पक्षांनी फ्लेक्स लावण्यासाठी कायमस्वरूपी जागा आरक्षित करण्यासाठी लोखंडी पाईपचे सांगाडे चौका चौकात लावले आहेत. यासंदर्भात महापालिकेचा आकाशचिन्ह विभाग राजकीय पक्षांवर कारवाई करताना दिसत नाही.

महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांतील आकाशचिन्ह आणि अतिक्रमण विभाग निष्क्रिय झाले आहे. शहर असो की उपनगरांतील महत्त्वाच्या चौकात, रस्त्यावर, पथदिव्यांच्या खांबांवर, वाहतूक नियंत्रण दिव्यांच्या खांबांवर सर्रास फ्लेक्स लागलेले दिसतात. वर्षभर या ना त्या उत्सवाचे नागरिकांना शुभेच्छा देण्याचे फ्लेक्स दिसतात. वर्षातील ३६५ दिवस पुढाऱ्यांपासून ते गल्लीतील कार्यकर्त्यांच्या वाढदिवसापर्यंत हे फ्लेक्स लागलेले असतात.

आकाशचिन्ह विभाग आणि अतिक्रमण विभाग अलिखित नियमाप्रमाणे संबंधितांना वाढदिवस किंवा कार्यक्रम झाल्यानंतर हे फ्लेक्स उतरवतात. नाही तर फ्लेक्स तयार करणारेच हे फ्लेक्स काढून दुसऱ्या व्यक्तीचा फ्लेक्स त्याठिकाणी लावतात. आता तर शहरासह उपनगरातील चौकाचौकात फ्लेक्ससाठी लोखंडी पाईपचे सांगाडे लावून जागा आरक्षित केल्या आहेत.

राजकीय नेते मंडळींमध्ये फ्लेक्स आणि होर्डिंगबाजी करण्याची स्पर्धा असते. त्याचा परिणाम शहर अधिकच विद्रुप होते. ही मंडळी बस स्थानक, शाळेच्या सिमाभिंती, पूल अशा सार्वजनिक ठिकाणी फ्लेक्सबाजी करतात. त्यांच्यावर कोणाचे नियंत्रण नाही. क्षेत्रीय कार्यालयातील आकाशचिन्ह विभाग आणि अतिक्रमण विभागाच्या निरीक्षकांना दमबाजी करून नेतेमंडळी सर्वत्र फ्लेक्स लावत आहेत.



### राजकीय पक्ष बुडवत आहेत पालिकेचा कोट्यवधींचा महसूल

» जाहिरातीचे फ्लेक्स हे पदपथ, रस्ता, पथदिव्यांच्या खांबांवर, शाळेच्या सिमाभिंती अशा सार्वजनिक व महापालिकेच्या मालकीच्या जागेवर लावता येत नाहीत. मात्र, अनेकजण पदपथावर फ्लेक्सबाजी करतात. नियमाप्रमाणे प्रति चौरस फुटाला २२२ रुपये दर महापालिका आकाशचिन्ह विभागाने ठरवून दिलेला आहे. त्यामुळे सहाशे चौरस फुटाला नऊ ते दहा हजार रुपये शुल्क संबंधितांना भरावे लागते. मात्र, हे शुल्क न भरता सर्व राजकीय पक्ष नियमांची पायमल्ली करून महापालिकेचे कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवत असल्याचे दिसून येते. त्यांच्यावर कारवाई कोण करणार, हा मुख्य प्रश्न आहे.

### उच्च न्यायालयाकडून आयुक्तांची नेमणूक

» काही वर्षांपूर्वी उच्च न्यायालयाने महापालिका स्तरावर अशा फ्लेक्सवर देखरेख व संबंधितांवर कारवाई करण्यासाठी आयुक्तांची नेमणूक केली होती. संबंधित आयुक्तांनी महापालिका व क्षेत्रीय स्तरावर बैठका घेतल्या. त्यानंतर अनेक ठिकाणी अनधिकृत बॅनर आणि फ्लेक्सवर कारवाईसुद्धा करण्यात आली. त्यानंतर मात्र, पुन्हा 'जैसे थे' परिस्थिती झाली आहे.

> शहरात अनाधिकृत फ्लेक्स लावण्यास मनाई असल्याचे सर्वच राजकीय पक्षांना सांगण्यात येणार आहे. त्यानंतर फ्लेक्स लावण्याऱ्यांवर कारवाई करण्याची सूचना आकाशचिन्ह आणि अतिक्रमण विभागाला करण्यात येणार आहे.
>
> \- डॉ. राजेंद्र भोसले, आयुक्त, पुणे महापालिका.

# पुरानंतर आता नदीकाठी साचलेल्या कचऱ्याचे संकट


## खडकवासला धरणाच्या खालच्या भागातील गावांपासून ते पुणे महापालिका हद्दीतील भागात वर्षभर सतत कचरा नदीत टाकला जात आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

मुसळधार पावसामुळे गेल्या दोन महिन्यांत तीन वेळा मुठा नदीत खडकवासला प्रकल्पातून पाणी सोडण्यात आले. या पुराच्या पाण्यासह शेकडो टन कचरा नदीत वाहून आला आहे. खडकवासला धरणाच्या खालच्या भागातील गावांपासून ते पुणे महापालिका हद्दीतील भागात वर्षभर सतत कचरा नदीत टाकला जात आहे. धरणातून पाण्याचा विसर्ग थांबल्यानंतर हा कचरा नदीपात्रात ठिकठिकाणी साचून नदी प्रदूषणात भर पडत आहे. गणेशोत्सवासारखा पवित्र सण जवळ तोंडावर आला असतानाच हा कचरा लवकर उचलला जात नसल्याने अनेक ठिकाणी नदीकाठी कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

सिंहगड रस्ता, भिडे पूल, पाटील इस्टेट, संगमवाडी, कर्वेनगर, आदर्शनगर, फुलेनगर, शांतीनगर झोपडपट्टी या भागांना नदीकाठी साचलेल्या ढिगाऱ्यांचा मोठा फटका बसत आहे. नदीलगत शहरातील अनेक वस्त्या, निवासी गृहप्रकल्प आहेत. त्यामुळे गेल्या काही वर्षांमध्ये नदीत टाकल्या जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण वाढले आहे. कचऱ्याची विल्हेवाट रोखण्यासाठी महापालिकेने पुलांवर आणि नाल्यांवर १५ फूट उंचीच्या जाळ्या बसवल्या आहेत. मात्र, बेजबाबदार नागरिक कचरा पुलांवरून आणि नाल्यांमध्ये टाकतच आहेत. लोकवस्तीच्या भागात नदीकाठावर अशाच जाळ्या बसविण्याची मागणी आता रहिवाशांकडून होत आहे.

जुलैच्या प्रारंभी पुणे महापालिकेशी समन्वय साधत अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांनी नदीपात्रात स्वच्छता मोहीम राबवली होती. त्यात नवी मुंबई, ठाणे, पनवेल महापालिकेतील अधिकाऱ्यांसह दोन हजार ३०० कर्मचाऱ्यांचा समावेश होता. या पथकांनी या स्वच्छता मोहिमेसाठी आवश्यक यंत्रे, उपकरणे पुरवली होती. त्यात ९६ क्रेन, ४० डीपी मशीन, ५० बीआरसी, आठ ट्रक, ३५ जेटिंग मशीन, १२१ कचरा ट्रक, २९४ छोट्या प्रमाणात उत्खनन करणारे एक्सक्लेवेटर, १२१ कॉम्पॅक्टर, २९ बिन लिफ्टर आणि ४० टिप्पर ट्रक्स यांचा समावेश होता. व्यापक प्रमाणात राबवलेल्या या मोहिमेमुळे २२८ टन कचरा, २६.५ टन गाळ आणि ३३.५ टन झाडांच्या अवशेषांचा कचरा जमा झाला.



> नदीपात्रात कचरा टाकला जाऊ नये, यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. पूरस्थिती कमी झाल्यावर नदीची स्वच्छता केली जात आहे. मात्र, प्रत्येक वेळी धरणातून पाणी सोडल्यानंतर नदीपात्र कचऱ्याच्या ढिगांनी तुडुंब भरते. कचऱ्याच्या वाढत्या ओघामुळे प्रशासनाला या कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागत आहे
>
> \- संदीप कदम,उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग, पुणे महापालिका

> "मी गेल्या सात वर्षांपासून नदीलगतच्या या भागात राहते. पावसाळ्यात नदीत पाणी सोडल्यानंतर नदीकाठी साचलेला कचरा हा नेहमीचाच प्रश्न आहे, त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती होते. दर पावसाळ्यात परिसरात दुर्गंधी, अनेक तक्रारी करूनही कारवाई होत नाही,"
>
> \- संगीता शिंदे,रहिवासी, संगमवाडी.

# देवेंद्र तायडे यांनी भरला 'पक्ष उमेदवारी अर्ज'

## पिंपरी विधानसभेसाठी इच्छुक असलेले देवेंद्र तायडे यांनी पक्ष उमेदवारी अर्ज जमा केला.



**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाकडून येणाऱ्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी पक्ष उमेदवारी अर्ज मागवण्यात आले आहेत. हे अर्ज पिंपरी मध्यवर्ती कार्यालय येथे उपलब्ध होते. अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ३ सप्टेंबर होती.

पिंपरी विधानसभेसाठी इच्छुक असलेले देवेंद्र तायडे यांनी पक्ष उमेदवारी अर्ज पक्षाच्या पिंपरी मध्यवर्ती कार्यालय येथे जमा केला. शहर सरचिटणीस जयंत शिंदे यांनी हा अर्ज स्वीकारला. यावेळी वरिष्ठ उपाध्यक्ष काशिनाथ जगताप, सचिव कमलेश वाळके व कार्यालयीन सहाय्यक अविनाश कांबळे उपस्थित होते.

# शहरातील सर्व पुतळ्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट होणार

## छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळा प्रकरणानंतर महापालिकेला आली जाग : शहर अभियंत्यांचे सर्व स्थापत्य अधिकाऱ्यांना पत्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळला, तर मोशीतील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या काही भागांना तडे गेले आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडून शहरातील सर्व महापुरुषाच्या पुतळ्यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात येणार आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील सर्व पुतळ्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा निर्णय घेतला आहे. शहरात विविध महापुरूषांचे ३९ पुतळे असून या सर्व पुतळ्यांचे १५ दिवसांत ऑडिट करण्यात येणार आहे. ऑडिटमध्ये काही बाबी निदर्शनास आल्यास तत्काळ पुतळ्याची दुरूस्ती करण्यात येणार आहे.



थोर महापुरूषांच्या कार्याची नवीन पिढीला माहिती व्हावी, महापुरूषांनी देशाच्या स्वातंत्र्यांसाठी दिलेल्या त्यागाची, बलिदानाची आणि त्यांचा प्रेरणादायी जाज्वल्य इतिहासाची आठवण अवितरतपणे समाजामध्ये, तरुणांना सदैव रहावी, भावी पिढीने महापुरूषांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांच्या विचारसरणीने आयुष्यात वागावे. त्यांचे विचार आत्मसात करावे.

या उद्देशाने शहराच्या प्रवेशद्वारावर, महत्वाच्या चौकात, शासकीय इमारतींमध्ये किंवा इमारतीसमोर महापुरूषांचे पुतळे उभारले आहेत. शहरात रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, क्रांतीवीर चाफेकर बंधू यांच्यासह आदी महापुरूषांचे तब्बल ३९ पुतळे उभारण्यात आले आहेत. मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना घडल्यामुळे राज्यातील सर्व शहरातील पुतळ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरात महापालिकेचे आठ क्षेत्रीय कार्यालय आहेत. या सर्व कार्यालयाअंतर्गत तब्बल ३९ पुतळे उभारण्यात आले आहेत. यामध्ये सर्वाधिक पुतळे हे ह प्रभाग कार्यालय क्षेत्रात १५, त्यानंतर अ प्रभाग कार्यालय क्षेत्रात ११, ग कार्यालय क्षेत्रात ५ आणि इतर पाच प्रभागात ८ असे ३९ पुतळे आहेत. हे पुतळे उभारण्यासाठी महापालिकेने आत्तापर्यंत कोट्यवधी रूपयांचा खर्च केला आहे.

### आठवण केवळ जयंती, पुण्यतिथीला

**» महापालिका कार्यक्षेत्रात जनसंपर्क विभागाकडून महापुरुषाची आठवण केवळ जयंती, पुण्यतिथीला येते. शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालय परिसरात ३९ पुतळे आहेत. यामधील काही पुतळे हे आडबाजूला आहेत. तर काही पुतळे दर्शनी भागात आहेत. या पुतळ्यांकडे महापालिका किंवा सामाजिक संस्था या फक्त जयंती आणि पुण्यतिथीला लक्ष देतात. बाकी वर्षभर पुतळ्यांकडे कोणीही लक्ष देत नाही. मात्र, महापालिका जनसंपर्क विभागाकडून शासकीय नियमांचे उल्लंघन सुरु आहे. शासनाचे आदेश डावलून प्रबोधन पर्व नावाखाली महापालिकेकडून जयंतीवर लाखो रुपये खर्च केले जात आहेत.**

> **मालवण घटनेच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व पुतळ्यांचे १५ दिवसांत स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार आहे. ऑडिटमध्ये काही बाबी निदर्शनास आल्यास तत्काळ पुतळ्याची दुरुस्ती करावी, अशा सूचना स्थापत्य विभागाच्या सर्व कार्यकारी अभियंत्यांना दिल्या आहेत.**
>
> **- मकरंद निकम, शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# गणेशोत्सवाच्या काळात जलतरण तलाव बंद!

## शहरातील सर्व जलतरण तलाव हे दहा दिवस बंद राहणार : क्रिडा विभागाचे सहाय्यक आयुक्त पंकज पाटील यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

क्रिडा विभागाकडील सर्व व्यवस्थापक, सुरक्षा अधिकारी, जीवरक्षक व इतर सुरक्षा कर्मचारी यांची सार्वजनिक गणेशोत्सवाच्या कामकाजासाठी ७ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर २०२४ या कालावधीत गणेश विसर्जन घाटांवर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात आलेली असल्याने शहरातील सर्व जलतरण तलाव हे दहा दिवस बंद राहणार असल्याची माहिती क्रिडा विभागाचे सहाय्यक आयुक्त पंकज पाटील यांनी दिली आहे.



महापालिकेच्या वतीने येत्या गणेशोत्सवाच्या अनुषंगाने सुयोग्य नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी क्षेत्रीय कार्यालयनिहाय असणाऱ्या विघटन केंद्र, विसर्जन घाटांवर अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून मुर्ती संकलनासाठी तसेच इतर कामकाजासाठी सुमारे ६४० वाहने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. महापालिका हद्दीत सुमारे ८५ विसर्जन घाट आहेत. त्यामध्ये अ, ब, क, ड, ई, फ, ग, ह क्षेत्रीय कार्यालयनिहाय अनुक्रमे १५, १४, ५, १३, १२, १०, ६, १० इतके विसर्जन घाट आहेत. या विसर्जन घाटांवर महापालिकेच्या वतीने विसर्जनाच्या दिवशी आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून या सुविधांची पुर्तता करण्यासाठी समन्वय अधिकारी, कर्मचारी तसेच विसर्जनाच्या दिवशी अनुचित प्रकार घडू नये यासाठी जीवरक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे.

### विसर्जनासाठी मार्गदर्शक सूचना

**» घरगुती गणपतीचे आणि गौरीचे विसर्जन शक्यतो घरी करण्यावर भर द्यावा किंवा मुर्तीदान प्राधान्य द्यावे. गणेश मंडळांनी गणेश मूर्तीचे विधीवत विसर्जन मंडपालगत (कृत्रिम हौदामध्ये) करण्यास प्राधान्य द्यावे. गणेश विसर्जनाच्या दिवशी (दिड दिवस, पाच दिवस, सात दिवस, नऊ दिवस व दहा दिवस ) प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयांमार्फत मूर्ती व निर्माल्य संकलनाकरीता फुलांनी सजवलेला सुशोभिकरण रथ उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.**

महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रभागामध्ये मूर्ती संकलन केंद्र उपलब्ध असणार आहेत. तसेच या केंद्रांवर मूर्ती विसर्जन करण्याकरीता नेण्यासाठी वाहने उपलब्ध असणार आहेत. श्रींच्या विसर्जनाकरीता प्रत्येकी २ कन्वेअर बेल्ट एका विसर्जन ठिकाणांवर उपलब्ध असतील. आवश्यकता भासल्यास अधिकचे कन्वेअर बेल्ट उपलब्ध करून देण्यात येतील. प्रत्येक प्रभागातील सुशोभित रथाच्या मूर्ती संकलनासाठी मार्गक्रमणिका प्रसिद्ध करण्यात येणार असून त्यानुसार नागरिकांनी व मंडळांनी गणेशमूर्तीचे दान करावयात. तसेच निर्माल्य स्विकारण्यासाठी ठेवण्यात आलेल्या वाहनात निर्माल्य देऊन सहकार्य करावे. महानगरपालिकेद्वारे संकलित केलेल्या गणेशमूर्तीचे विधीवत व पावित्र्य राखून विसर्जन करण्यात येईल, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# ऐन पावसाळ्यात पुण्यात टँकरवाढ..!

## टँकरपोटी मोजाव्या लागणाऱ्या अतिरिक्त शुल्काच्या भुर्दंडामुळे खराडी, लोहगाव, एनआयबीएम परिसरातील नागरिकांची नाराजी कायम

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात विविध भागांतील रहिवासी ऐन पावसाळ्यात पाणीटंचाईला तोंड देत आहेत. गेल्या चार महिन्यांत शहरातील विविध भागांना पाणीपुरवठा करणाऱ्या टँकरची संख्या ४० हजारपर्यंत वाढली आहे. पण या टँकरवाढीमुळे नागरिकांची नाराजी कमी झालेली नाही. टँकरपोटी मोजावा लागणारा अतिरिक्त शुल्काचा भुर्दंड आणि तरीही पुरेशा प्रमाणात पाणीसाठा होत नसल्याने टंचाईला तोंड द्यावे लागत असून याला रहिवासी वैतागले आहेत.



खराडी, लोहगाव, 'एनआयबीएम'सारख्या भागात आणि महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांसह शहरालगतच्या भागात ही पाणीसमस्या गंभीर आहे. पुण्यात जुलैत मुसळधार पाऊस पडला होता. या काळात पाण्याची मागणीही तुलनेने कमी असते. तरीही या भागातील पाणीसंकटाची तीव्रता कमी झालेली नव्हती. पुणे महापालिकेकडील आकडेवारीनुसार, एकट्या जुलैत तब्बल ४२ हजार २२० पाणी टँकरने या भागांना पाणीपुरवठा सुरू होता. पण असे असले तरी, यामुळे आमच्या भागाची पाणीसमस्या कायमस्वरुप सुटणार आहे का, असा प्रशासनाला अडचणीचा ठरणारा प्रश्न येथील रहिवासी विचारत आहेत.

पुण्याच्या जलव्यवस्थापनाच्या मर्यादा या समस्येमुळे अधोरेखित होत आहेत. पुणे महापालिकेची हद्द विस्तारली, परंतु या वाढलेल्या लोकसंख्येला पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करणे प्रशासनाच्या आवाक्याबाहेर चालले आहे. आठवड्याचे सर्व दिवस २४ तास पाणीपुरवठा प्रकल्प उभारण्याच्या घोषणा झाल्या. मात्र हे प्रकल्प पूर्ण न झाल्याने या भागातील रहिवाशांना दररोज पाण्यासाठी टँकरवरच अवलंबून रहावे लागत आहे. त्यामुळे महापालिकेच्या आणि खासगी अशा दोन्ही टँकरसेवेवर रहिवाशांना मोठा खर्च करावा लागतो. हा खर्च कोट्यवधींच्या घरात गेला असल्याने नागरिकांवरील आर्थिक बोजा प्रचंड वाढला आहे.

> आम्ही आवश्यक तेवढे पाण्याचे टँकर देत आहोत. हे टँकर तपासणी नाक्यावर तपासले जातात आणि त्यानंतर पुरवठा केला जातो. रहिवाशांच्या वाढत्या गरजेनुसार पाण्याच्या टँकरच्या संख्येत वाढ होते. आम्ही या भागांना दररोज २४ तास पाणीपुरवठा करणाऱ्या प्रकल्पांच्या पूर्ततेच्या दिशेने सतत कार्यरत आहोत.
>
> **- नंदकिशोर जगताप, मुख्य अधीक्षक अभियंता, पाणीपुरवठा विभाग.**

सध्याची परिस्थिती पुण्याच्या जलव्यवस्थापनातील अपुरेपणा अधोरेखित करते. पीएमसीने सुरू केलेल्या २४/७ पाणीपुरवठा प्रकल्पामुळे अनेक घरांतील नळ कोरडेच आहेत. हा प्रकल्प पूर्ण करण्यात अयशस्वी झाल्यामुळे रहिवाशांना त्यांच्या दैनंदिन गरजांसाठी मोठ्या प्रमाणातक पाण्याच्या टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे, ज्यामुळे त्यांना खाजगी आणि पुणे महापालिका संचालित दोन्ही टँकरवर मोठा खर्च करावा लागतो. नागरिकांवरील आर्थिक बोजा कमालीच्या पातळीवर पोहोचला असून, खर्च कोट्यवधींच्या घरात गेला आहे.

विस्तारलेल्या या पुण्यात २५ वर्षांहून अधिक काळ पाणीटंचाईच्या तक्रारी आहेत. मात्र, यावर ठोस उपाययोजना अद्यापही करण्यात आलेली नाही. पाणीपुरवठा प्रकल्प पूर्ततेच्या दिशेने कोणतेही भरीव प्रयत्न होताना दिसत नाहीत. हा प्रश्न सुटण्याच्या आशेने रहिवाशांनी वारंवार प्रभाग कार्यालये आणि महापालिका आयुक्तांकडे धाव घेत दाद मागितली. अनेक पत्रे सादर केली आणि असंख्य बैठकांना हजेरी लावली. असे प्रयत्न करूनही पुणे महापालिकेकडून या समस्येबाबत कोणतीही लक्षणीय सुधारणा झालेली नसून, रहिवाशांना दिलासा मिळालेला नाही.

# खंडोबा हे देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांचे दैवत

## सरसंघचालक मोहन भागवत यांचे प्रतिपादन : जेजुरी देवस्थानाकडून मानपत्र प्रदान

**पुणे | प्रतिनिधी**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांचे दैवत म्हणजे खंडोबा. जेजुरी गडावर आल्यामुळे आज खऱ्या अर्थाने माझे देवदर्शन झाले आहे. समाज जागृतीचे हे श्रद्धा केंद्र असून, धर्म याच श्रद्धेमुळे टिकला आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केले.



सरसंघचालकांनी गुरूवारी (ता.५) जेजुरी येथील श्री मार्तंड देव संस्थानाला भेट देत श्री खंडोबाचे दर्शन घेतले. यावेळी श्री मार्तंड देव संस्थानचे प्रमूख विश्वस्त अनिल सौंदडे, विश्वस्त अभिजित देवकाते, विश्वस्त राजेंद्र खेडेकर, विश्वस्त मंगेश घोणे, विश्वस्त ॲड. विश्वास पानसे, विश्वस्त ॲड. पांडुरंग थोरवे, विश्वस्त पोपट खोमणे, पदसिद्ध विश्वस्त तहसिलदार विक्रम राजपूत, व्यवस्थापक आशिष बाठे उपस्थित होते. देव संस्थान आणि जेजूरी ग्रामस्थांच्या वतीने सरसंघचालकांना समरसतेच्या कार्यासाठी मानपत्र प्रदान करण्यात आले. सरसंघचालकांनी यावेळी देवाचा तळी भंडारा केला. यावेळी देवाच्या खंडा तलवारीची कसरत त्यांनी पाहिली.

गडावर येत्या काळात नवीन भक्तनिवास उभारण्यात येणार असून, गुरूकुल पद्धतीचे शिक्षणही उपलब्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रमूख विश्वस्त अनिल सौंदडे यांनी यावेळी दिली. यावेळी द्वादश मल्हार दर्शन सृष्टीचे भूमिपूजन सरसंघ चालकांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील खंडोबा देवाची प्रमुख १२ ठाणी आहेत. याचे दर्शन जेजूरीत येणाऱ्या भाविकांना एकाच ठिकाणी व्हावे, या उद्देशाने देव संस्थान आणि पूरातत्व विभागाच्या वतीने द्वादश मल्हार दर्शन सृष्टी उभारण्याचे कार्य होणार आहे.

> भौतिक जगातील वैभवाबरोबरच आध्यात्मिकतेतील प्रविणता सांगणारा आपला धर्म आहे. जेजुरी गडाच्या परिसरात परकीय आक्रमक स्वस्थपणे झोपू शकला नाही. धर्म ज्या श्रद्धेमुळे आहे. त्याची जागृती करणारे हे ठिकाण आहे.
>
> **- डॉ. मोहन भागवत, सरसंघचालक, रा.स्व.संघ.**

श्री खंडेरायाची पगडी, घोंगडे आणि भारतमातेच्या प्रतिमेने संरसंघचालकांचे स्वागत करण्यात आले. स्वागत मंगेश घोणे, प्रास्ताविक अनिल सौंदडे यांनी केले. तर मानपत्राचे वाचन पोपट खोमणे यांनी केले.

